नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमधील नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गातील स्त्रियांचे आरक्षण चक्रानुक्रमे फिरविण्यासंबंधी...

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक :-रानिआ/मनपा-२०१४/प्र.क्र. २६/का.५,
नवीन प्रशासन भवन, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०००३२
दिनांक :- ०६/०२/२०१५.

## आ दे श

ज्याअर्थी भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ झेडए अन्वये राज्य निवडणूक आयोगावर महानगरपालिकांच्या निवडणुकांची जबाबदारी सोपविलेली आहे.

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्रातील महानगरपालिका, नगर परिषदा आणि नगर पंचायती या नागरी क्षेत्राची निवडणूक प्रभागामध्ये विभागणी करण्याबाबत क्रमांक रानिआ/मनपा २००५/प्र.क्र.१७/का.५, दिनांक ३ मे, २००५ व क्रमांक रानिआ/मनपा २००९/प्र.क्र.५/का.५, दि.१० जुलै, २००९ च्या आदेशान्वये आरक्षण फिरविण्यासंदर्भात निर्गमित केलेल्या आदेशामध्ये नागरीकांच्या मागासवर्ग प्रवर्गाची सोडत कशाप्रकारे काढण्यात यावी याबाबत स्पष्ट उल्लेख नाही.

आणि ज्याअर्थी, शासनाने सन २०१४ चा महाराष्ट्र अध्यादेश क्र. १८ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ च्या कलम ५ मध्ये सुधारणा केली असून त्याद्वारे महानगरपालिकेच्या प्रत्येक प्रभागातून केवळ एकच पालिका सदस्य निवडून देण्यात येईल अशी तरतूद करण्यात आली आहे.

आणि ज्याअर्थी, नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाचे आरक्षण चक्रानुक्रमे फिरवून नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गातील स्त्रियांची सोडत काढतांना अनुसरावयाची कार्यपध्दती सदर महानगरपालिकांकरिता निश्चित करून देणे आवश्यक आहे.

आणि त्याअर्थी, राज्य निवडणूक आयोग भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ झेडए तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम ५ व १४ (४) अन्वये मिळालेल्या व इतर प्राप्त अधिकारांचा वापर करून यासंदर्भात दिनांक ३ मे, २००५ व दि.१० जुलै, २००९ अन्वये देण्यात आलेल्या आदेशानुसार नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाचे आरक्षण चक्रानुक्रमे फिरवून नागरीकांच्या

मागासवर्ग प्रवर्गातील स्त्रियांची सोडत काढतांना अनुसरावयाची कार्यपध्दती पुढीलप्रमाणे निश्चित करून देण्यात येत आहे:-

१. प्रथम सर्व प्रभागांपैकी या निवडणुकीमध्ये अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीकरीता आरक्षित झालेले प्रभाग वगळण्यात यावेत.

२. त्यानंतर उर्वरित प्रभागांमधून मागील निवडणुकीमध्ये नागरीकांचा मागासवर्ग प्रवर्गाकरीता आरक्षित असलेले प्रभाग वगळण्यात यावेत.

३. यानंतर शिल्लक राहिलेल्या प्रभागांमधून नागरीकांच्या मागासवर्ग प्रवर्गातील स्त्रियांव्यतिरिक्त उर्वरित( म्हणजेच नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाकरिता आरक्षित करावयाच्या एकूण संख्येमधून नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाच्या स्त्रियांकरिता आरक्षित करावयाच्या प्रभागांची संख्या वजा केल्यानंतर येणाऱ्या संख्ये इतके ) प्रभाग सोडतीने निश्चित करण्यात यावेत.

४. यानंतर उर्वरित प्रभागांच्या चिठ्ठयांमधून मागील निवडणुकीमध्ये कोणत्याही प्रवर्गातील स्त्रियांकरीता आरक्षित असलेले प्रभाग वगळून शिल्लक राहिलेल्या प्रभागांमधून नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गातील स्त्रियांची सोडत काढण्यात यावी. असे करताना लागोपाठच्या निवडणूकीत महिला आरक्षण शक्यतोवर होणार नाही याची दक्षता घ्यावी.

मात्र जर उर्वरित प्रभागांच्या चिठ्ठयांमधून मागील निवडणूकीमध्ये कोणत्याही प्रवर्गातील स्त्रियांकरीता आरक्षित असलेले प्रभाग वगळून शिल्लक राहिलेल्या प्रभागांची संख्या नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गातील स्त्रियांकरीता आरक्षित पदांच्या संख्येपेक्षा कमी असल्यास शिल्लक राहिलेले सर्व प्रभाग नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाकरीता आरक्षित होतील व नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गातील स्त्रियांकरीता आरक्षित करावयाचे उर्वरित प्रभाग वगळण्यात आलेल्या प्रभागांमधून सोडतीने निश्चित करण्यात येतील. असे करताना लागोपाठच्या निवडणूकीत महिला आरक्षण शक्यतोवर होणार नाही याची दक्षता घ्यावी. अशा अपरिहार्य परिस्थितीध्ये काही प्रभागांमध्ये माहिला आरक्षण पुन्हा होईल.

मा.राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

( नि. ज. वागळे )
अवर सचिव,
राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

प्रति,

१. प्रधान सचिव( २ ), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
२. सर्व महानगरपालिका आयुक्त (बृहन्मुंबई महानगरपालिका वगळून)
३. राज्य निवडणूक आयोगातील सर्व अधिकारी
४. निवड नस्ती.

D:\Corpn २०१४-१५\Election २०१४-१५ Feb..docx